REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# सामान्य माणसाचं जगण उलघडून दाखवणाऱ्या कविता : *प्रकाशकण उमलताना*

**प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**मराठी विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.**

*** प्रास्ताविक :**




भारतीय साहित्यक्षेत्रात काव्य हा एक आत्मनिष्ठ वाङ्मय प्रकार म्हणूनच उदयास आलेला पहावयास मिळतो तथापि कवीची ही आत्मनिष्ठा तात्कालिन सामाजिकतेपासून अलिप्त राहू शकत नाही. हेही वास्तव आपणास लक्षात घ्यावे लागते. काव्य हा वाङ्मय प्रकार समकालिन सामाजिक जीवनातील विविध स्थित्यंतरे आणि प्रवृत्तीपासून वेगळा काढता येत नाही. मूलतः मराठी वाङ्मयाच्या निर्मितीची मूळ संरचना ही पद्य वाङ्मयातूनच उदयास आली आहे. प्रदीर्घ अशी पद्य वाङ्मय परंपरा असलेल्या मराठी साहित्यामध्ये कालानरुप गद्य पद्यात्मक वाङ्मय निर्मितीला चालना मिळाली. संत साहित्य, पंडिती साहित्य, शाहिरी वाङ्मय ही मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील महत्वाचे टप्पे लक्षात घेतल्यानंतर स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्याच्या रचनेबरोबरच आशय आणि अभिव्यक्तीमध्ये अमुलाग्र स्वरूपाचा बदल झालेला पहावयास मिळतो.

*** आधुनिक मराठी कालखंडातील कविता :-**

आधुनिक मराठी काव्याचे जनक म्हणून आपण कवी केशवसुतांचा उल्लेख करतो. केशवसुतांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात क्रांती केली असा त्यांचा सार्थ गौरवही आपण करत असतो. केशवसुतांनी मराठी कवितेच्या आशय, अभिव्यक्ती आणि रचनातंत्रामध्ये मुलभूत परिवर्तन घडविले. केशवसुतांच्या पुर्वीची कविता काही अपवाद वगळता 'देव' या संकल्पनेच्या भोवती फिरत होती. ही संकल्पना बदलून मराठी कवितेला सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी जोडण्याचे अत्यंत क्रांतिकारक कार्य केशवसुतांनी केले आहे.

'सर्वास देवा पाहतोस सारखा ।
होतोस का रे गरिबास पारखा ।।'

असा स्पष्ट सवाल करून समाजातील सर्वसामान्य माणसाच्या व्यथा मराठी कवितेतून त्यांनी प्रथमच व्यक्त केल्या. त्यांचा हा आदर्श डोळयासमोर ठेऊन त्यांच्यानंतरच्या अनेक कवींनी मराठी कवितेचे क्षेत्र अधिकाधिक व्यापक- समृध्द करण्याचा प्रयत्न केला.

*** स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कविता :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय समाज जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच संदर्भ बदलून गेले. औद्योगिकरणाचा झालेला विकास खेडयाकडून शहराकडे जाण्यासाठी लागलेला लोंढा, शहराचे निर्माण झालेले विविध प्रश्न, जगण्याचे बदलेले संदर्भ, मानवी जीवनातील क्षणभंगूरता या सर्व घटकांचा तात्कालिन वाङ्मयनिर्मितीवर परिणाम झाला नसता तरच नवल ! याच कालखंडात नामदेव ढसाळ, दया पवार, शंकरराव खरात, नारायण सुर्वे, शंकर पाटील, पाडगावकर, वसंत बापट यासारख्या अनेक कवी-लेखकांनी आपल्या भोवतालचे सामाजिक वास्तव आपल्या लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केला. या संदर्भात डॉ.रवींद्र ठाकूर म्हणतात "१९७५ नंतरच्या कवितेचा आस सामाजिक जाणिवांकडे झुकलेला आहे. १९७५ पूर्वीचे चित्र काहिशे वेगळे आहे. त्या काळात रेगे, आरती प्रभु, ग्रेस, ना.धो.महानोर, बापट, पाडगावकर, सुरेश भट, इंदिरा संत, शांता शेळके अशा सामाजिक जाणिवांपासून प्रायः फटकून असलेल्या भावकवी

कवयित्रींच्या कवितेचा प्रवाह केंद्रस्थानी असलेला दिसतो."[१] या कालखंडात नारायण सुर्वे, विं.दा. करंदीकर यांच्या सामाजिक जाणिवांच्या कवितेचा प्रवाह फारसा प्रभावी नव्हता. असे असले तरी सुध्दा या निमित्ताने सामाजिक जाणिवा हा काव्याचा एक महत्वाचा घटक होऊ शकतो याची प्रभावीपणे जाणिव यानिमित्ताने झाली असे म्हणावयास हरकत नाही.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या सार्वत्रिकरणामुळे ग्रामीण समाज जीवनात एक प्रकारची जागृती निर्माण झाली. तरूण पिढीला आपल्या भोवतालच्या सामाजिक वास्तवाचे भान आले. यामधूनच ग्रामीण साहित्य निर्मितीला चालना मिळाली. १९७५ ते १९८० च्या दरम्यान ग्रामीण साहित्य प्रवाहाने एक प्रकारचे चळवळीचे रूप धारण केले. या कालखंडातील ग्रामीण साहित्य निर्मितीबाबत डॉ.ठाकूर म्हणतात "१९७५ नंतर ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाने चळवळीचे रूप धारण केले. त्याची नाळ बहूजन समाजाच्या प्रश्नांशी, त्याच्या भावभावनाशी जोडली गेली. भाषा, विषय याचे कुठलेही दडपण न घेता ग्रामीण लेखक, कवी आपल्या अनुभव विश्वाला शब्दरूप देऊ लागला. काव्याच्या क्षेत्रात हा बदल होण्यास थोडासा उशीर झालेला असला तरी गद्य साहित्यातील हा बदल अधिक स्पष्टपणे नजरेत भरला."[२] याच दरम्यानच्या कालखंडात ना.धो.महानोर, कवी विठ्ठल वाघ, पुरुषोत्तम पाटील, शंकर बडे, आनंद यादव, वहारू सोनवने, प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव यासारख्या अनेक कवींनी आपले अनुभव विश्व कवितेच्या माध्यमातून शब्दबध्द केलेले दिसून येते. या सर्वच कवींनी आपल्या काव्यनिर्मितीच्या माध्यमातून ग्रामीण समाजजीवनातील विविध जाणिवा अत्यंत संवेदनशीलतेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण संवेदनशीलता हा ग्रामीण कवितेचा आत्मा आहे. ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता होय. डॉ.आनंद यादव म्हणतात- "कलावंताची संवेदनशीलता म्हणजे अनुभव घेण्याची त्यांची पध्दती. बाहय वास्तव, सभोवताली घडणाऱ्या घटनांबद्दल प्रतिक्रिया देणारी संवेदनशीलता, अनुभवाबद्दल विशिष्ट जाणिव निर्माण करत असते."[३] याच संवेदनशीलतेतून उच्च प्रतिचे काव्य निर्माण होण्यास मदत होताना दिसून येते. या कवींच्या काव्यलेखनाचा आदर्श डोळयासमोर ठेऊन गेल्या दशकात अनेक कवींनी ग्रामीण समाजजीवन आपल्या काव्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कवी झुंजार माने हे अशाच प्रकारच्या ग्रामीण समाजजीवनात रमणारे कृषी संस्कृती, बदलते ग्राम जीवन, ओस पडणारी खेडी, आजच्या आधुनिक कालखंडात खेडयामध्येसुध्दा होत असलेली नीतिमूल्यांची घसरण विविध प्रकारच्या मानवी प्रवृत्ती यामुळे अस्वस्थ होतात. त्याच अस्वस्थेतून ग्रामीण सामाजिक वास्तवावर प्रकाश टाकणारे लेखन त्यांनी केले आहे. 'कोसलेभाव सुमनांचे' या त्यांच्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या काव्यसंग्रहातून ग्रामीण संस्कृतिचे चित्र प्रभावीपणे पुढे आले आहे. तर 'प्रकाशकण उमलताना' या काव्यसंग्रहाच्या निमित्तानेसुध्दा कवी झुंजार माने यांनी ग्रामीण समाज जीवनाचे विविध पदर उलघडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून ग्रामीण माणसाच जगण अत्यंत वास्तववादी स्वरूपात उलघडण्याचा प्रयत्न केला आहे.

*** बदलत्या ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकणारी कविता :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेडयाचे मूळ रूप बदलत जाऊन हळूहळू या गावकोसाला शहरी संस्कृतीचा वारा स्पर्श करतो की काय अशी भावना कवीने 'कात' या कवितेतून व्यक्त केली आहे. आज मातीच्या रस्त्याची जागा डांबरी रस्त्याने घेतली आहे. मातीमधला ओलावा नष्ट होऊन पायाला चटके देवू लागला आहे. पांदिचा रस्ता, गावाचा पिंपळ, गोंदणीच झाड, कुसावरचा नांगर हे सर्वच संदर्भ बदलून जगणचं कस आधुनिक होत गेल आहे. कवी म्हणतो -

'पवनचक्की, मोबाईलचे टॉवर वाढले
बापजाद्यांच्या जमिनी भाडेपट्टयाने दिल्या
तांबडया मातीत सिमेंट कालवले
ताटव्याजवळ हिरवं पान राहिलं नाही '

(प्रकाशकण उमलताना, पृ.१)

कुटुंबाच्या परंपरेने चालत आलेली जमिन जीवापेक्षाही लाख मोलाची म्हणून जोपासली जात होती. मात्र आज क्षणिक सुखासाठी खेडयातसुध्दा जमिनी पवनचक्या आणि मोबाईल टॉवरसाठी भाडयाने दिल्या जावू लागल्या, सिमेंटची जंगले उभी राहू लागली आणि माणसातील माणूसपणं हरवून गेले असेच कवीला सांगावयाचे आहे. 'गिअर' या शिर्षकाच्या कवितेत सुध्दा अशाच प्रकारची भावना जणू कवीला व्यक्त करावयाची असावी. जागतिकीकरणामुळे माणसातील माणुसपण कमी होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राष्ट्रीय पातळीवर प्रगतीचा वेग वाढला. समाजातील विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी क्षणिक पैशाच्या मोहासाठी आपली जमिन पवनचक्यासाठी धनिकांना विकू लागला. यामधून पैसा आला मात्र माणसातील माणुसपण नष्ट झाले. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आटत गेला आणि नात्यामध्ये एक प्रकारची कृत्रिमता आली. 'उपरा' ही कविताही अशाचा प्रकारचा काही भाव व्यक्त करून जाते. द्रारिद्रयाच्या कचाटयात सापडलेल्या सामान्य शेतकऱ्याची वेदना प्रस्तुत कवितेतून अधिक ठळकपणाने कवीने व्यक्त केली आहे. पोटाच खळगं भरण्याची भ्रांत अखंड निर्माण झाली आहे. ही वेदना व्यक्त करताना कवी म्हणतो -

'वेदना मारण्यासाठी धपकन झोपावं
पहाटं उठून कुरकुरावं, कधी तापावं
जमीन हुती, प्रकल्प कसले आले
आज हाय, उद्या न्हाय, मन मेले

(प्रकाशकण उमलताना, पृ.१४)

शहरातील माणसाच्या जगण्याची नजर गावाकडे वळाली. खेडयातील माणसे बेभान झाली. बघता बघता गाव आणि शिवार ओस पडली. या जाणिवेने कवी अस्वस्थ झालेला पाहावयास मिळतो.

*** मानवी प्रवृत्तींचा वेध घेणारी कविता :-**

आजही ग्रामीण समाजजीवनातील सामान्य माणसाच्या जगण्याला माणूसकीची ओलावा असलेला पहायला मिळतो. मात्र शहरामध्ये जगण्यातसुध्दा एक कृत्रिमपणाच आलेला दिसून येतो. कोंबडयाच असवण, शाळेत जाणं, खेडयातील जणावरसुध्दा माणसावर जीवापाड प्रेम करतात, मात्र शहरातील माणसं माणसावरचं प्रेम करून विसरून गेलेत. ती केवळ कामापुरतीच राहतात. या माणसाच्या जगण्याच्या विविध तऱ्हा कवीने आपल्या कवितेतून व्यक्त केल्या आहेत. 'छापा-काटा' या कवितेतून जणू शहर आणि खेड यांच्यामध्यला वृत्ती, प्रवृत्तीच दर्शन कविला मांडावयाचे आहे. याच वर्णन करताना कवी म्हणतो -

शहरात प्रायव्हसी, सिक्युरिटी टाईट
खेडयातील जीवनातील मानपान, रूसवे-फुगवे
शहरात मात्र गोष्ट मनावर न घेणे, न दणे
गावाकडे उसने-पासने उदार
इकडे मात्र सेल्फ इटिम, लगचे कंडका लगेच पसार

(प्रकाशकण उमलताना, पृ.१६)

प्रस्तुत काव्य पंक्तीतून शहर आणि खेड यांच्यातील व्दंद अचूक शब्दात कवीने व्यक्त केले आहे. आज समाजाच्या सर्वच क्षेत्रात निर्माण झालेली बेशिस्त, त्यामुळे निसर्गाचे बिघडलेले संतुलन 'शिस्त' नावाच्या कवितेत कवीने अचूकपणे मांडले आहे. माणसाने आपले जगणे अधिकाधिक सुसाहय करण्यासाठी आपल्या क्षमतेचा पुरेपूर वापर करून भौतिक सुविधा निर्माण केल्या.डांबरी रस्ते, उंच उंच इमारती, टॉवर निर्माण करण्यासाठी प्रचंड वृक्षतोड केली परिणामी निर्सगाचा समतोल बिघडला, पर्जन्यवृष्टी कमी झाली. कवी झुंजार माने उपरोधाने म्हणतात -

ज्यांना जमिनही नाही, रोजगार नाही
त्यांनी कशासाठी कोणाच्या दारात बोंब मारायची
जिथं प्यायलाच पाणी नाही
त्यांनी कोणाच्या पिकासाठी आंदोलनं करायची

(प्रकाशकण उमलताना, पृ.२०)

माणसाला नियम लावता येतात निर्सगाला नाही. म्हणून कवी म्हणतो बायोमेट्रीक, थम इंप्रेशन पावसाचे घेता येत नाही. वाढणारी लोकसंख्या त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न यापासून सुटका करावयाची असेल तर शाश्वत पर्यावरणाची निर्माती करण्यासाठी प्रथम माणसाने स्वतःला शिस्त लावली पाहिजे.

विविध मानवी प्रवृत्तींचे चित्रण करताना भ्रष्टाचार हेही एक मानवी प्रवृत्ती कवीच्या नजरेतून सुटू शकली नाही. आधुनिकीकरणाच्या मृगजळाच्या मागे लागून आजच्या औद्योगिकीकरणामध्ये कृषी संस्कृतिचा जसा ऱ्हास झाला आहे. तसा वन संस्कृतीचाही ऱ्हास झाला आहे. भ्रष्ट आचरणाच्या प्रवृत्तीमुळे माणसातील माणूसकीचा ओलावा नष्ट होवून भ्रष्ट आचरण हीच संस्कृती झाली आहे. याची जाणिव कवीने प्रभावीपणे करून दिली आहे.

*** मानवी जीवनाचे चिंतन करणारी कविता :-**

मृत्यु ही मानवी जीवनातील अंतिम रेषा आहे. वाळवंटी प्रदेशात केवळ जीवंत असण्यातच समाधान आहे. मृत्यु हा माणसाला सर्व काही शिकवतो. शांत, स्थिर, संयमी जीवन हाच खरा जगण्याचा मार्ग आहे. मानवी जीवनातील सामाजिक वास्तवता मांडताना कवी म्हणतो-

'तुझ्या चांगुलपणाची चर्चा, तीन दिवसातच आटोपते
तु लई मुरब्बी असशील
तर तुझा फोटो पेपरात आणि सोशल मिडीयात असेल'
(प्रकाशकण उमलताना, पृ.२४)

अशाच प्रकारचे मानवी जीवनाचे चिंतन 'गुळगुळीत' या कवितेतही आलेले पहावयास मिळते. यातून कविने माणवाच्या आत्मकेंद्री प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे. तर 'षडयंत्र' नावाच्या कवितेतून माणसाच्या अविचारी प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. दगडाला देव मानून त्याच्या समोर नतमस्तक होणारा माणूस माणसासारख्या माणसाला मात्र दुय्यम ठरवतो, माणुसकीला काळीमा फासतो आणि त्यामुळेच शेवटी पश्चाताप करण्याची वेळ येते. ही जाणीव कवीने अत्यंत प्रभावीपणे कवितेतून व्यक्त केली आहे.

*** महानगरीय समाजजीवनाचे चित्रण करणारी कविता :-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषत: १९६०-७० नंतरच्या कालखंडात औद्योगिकीकरणाचा वेग झपाटयाने वाढला आणि पाहता पाहता खेडयातील माणसांचा लोंढा शहराकडे झेपावत गेला. या घटनेचे दूरगामी परिणाम माणसाच्या जगण्यावर झाले. या घटनेने अस्वस्थ झालेल्या कवी मनाने महानगरीय समाजजीवनाचे वास्तव चित्रण 'जगणं-मरणं' या कवितेतून मांडली आहे. तर 'परावलंबन' या कवितेत जीवनाचे बदलते संदर्भ कवी अधोरेखित करतो. शहरी संस्कृतिच्या हव्यासामुळे माणूस माणसावर प्रेम न करता पदावर प्रेम करू लागली आहेत. अशा माणसांची संख्या झपाटयाने वाढती आहे. याची सार्थ खंत आणि भिती कवी व्यक्त करून जातो.

*** मानवी नीतिमूल्यांचा विचार मांडणारी कविता :-**

आजच्या गतिशील समाज जीवनात मानवी जीवनातील नीतिमूल्यांची होत असलेली घसरण कवी मनाला अस्वस्थ करून जाते. आजच्या अत्यंत धकाधकीच्या जीवनात माणूस क्षणिक सुखाच्या मागे लागून जीवनातील खऱ्या आनंदाला पारखा झाला आहे. जे लोक अत्यंत निष्ठेने, प्रामाणिकपणे आपल्या कामावर, कर्तृत्वावर श्रध्दा ठेऊन कष्ट करत असतात अशा व्यक्तींकडेच समाज आपूलकीच्या भावनेने पाहतो. हा अत्यंत उच्च दर्जाचा विचार कवीने मांडला आहे. तो म्हणतो -

'जे घाम गाळतात, उन्हात तळतात
ज्यांना सोन्यासवे जाळतात
त्यांच्यावर यशशिखरे भाळतात
(प्रकाशकण उमलताना, पृ.४१)

अशाच प्रकारचा सामाजिक नीतीमूल्यांचा विचार 'ढिला' या कवितेतूनही कवीने व्यक्त केला आहे. समाजातील सामान्य माणूससुध्दा क्षणिक सुखाच्या मागे लागून स्वत:ची नीतीमूल्ये हरवत निघाला आहे. स्वत:च्या स्वार्थापुढे आई, वडील, भाऊ यासारख्या पवित्र नात्यांचीही किंमत उरली नाही. हे शल्य कवी व्यक्त करून जातो. ही मूल्ये व्यवस्था ढासळता कामा नये. अशाप्रकारची जाणिव कवीने प्रस्तुत कवितेतून व्यक्त केला आहे. तो म्हणतो -

पिकवताना दाणा, मिळवताना आणा,
फिरवताना घाणा, पिसताना चणा,
राखताना बाणा,
मात्र तू ढिला पडू नकोस'
(प्रकाशकण उमलताना, पृ.४४)

अशा प्रकारचा सामाजिक नीतीमूल्ये विचार कवीने अनेक कवितांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व समाजजीवनातील संदर्भाला स्पर्श करत असतानाच ग्रामीण संस्कृतीमध्ये असलेल्या कृषी संस्कृतीची ओढ कवी मनातून कधीच निघून गेली



LBP PUBLICATION

नाही. 'भिजपाऊस' या कवितेत ग्रामीण समाज जीवनात पहिल्या पावसात भिजण्यासाठी असूललेली धरतीमाता एखाद्या जातकासारखे पावसाच्या थेंबाची वाट पाहते. केवळ पहिल्याच भिजपावसाने निसर्ग कसा फुलून येतो. याचे अत्यंत चैतन्यदायी वर्णन कवीने केले आहे. 'भिजपाऊस' या कवितेत तो म्हणतो-

'भिजपावसात फुलतो अंकुरतुरा
भिजपावसात पान्हवते ही धरा
कुंद डोंगरदरा, धुंद चैतन्य झरा
भिजपावसात नाहतो तेलपाणी चिरा'

(प्रकाशकण उमलताना, पृ.६१)

ग्रामीण समाजजीवनात कृषि संस्कृतीला अनन्यसाधारण महत्व असलेले दिसून येते. या कृषिसंस्कृतीचे वर्णन कवी झुंजार माने यांनी आपल्या कवितेतून अत्यंत प्रभावीपणे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. कृषिसंस्कृतीचे महत्व स्पष्ट करताना डॉ.नलिनी महाडिक म्हणतात "कृषि मूलहि जीवनम् हे मानवी संस्कृतीचे अधिष्ठान आहे. तर साहित्य व साहित्यिकांनी निर्माण केलेली मानवी जीवनाची शब्दसृष्टी आहे."[४] ग्रामीण समाजजीवनाचे अस्सल प्रतिबिंब कवी झुंजार माने यांच्या प्रकाशकण उमलताना या कवितेतून पहावयास मिळतात.

### * निष्कर्ष :-

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य क्षेत्रात जे महत्वाचे वाङ्मय प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा एक महत्वाचा साहित्य प्रवाह मानला जातो. कृषिसंस्कृती ही मध्यवर्ती ठेऊन जगणाऱ्या ग्रामीण समाजजीवनाचे अनेक पैलू कथा कादंबऱ्याबरोबरच कवितेतूनही व्यक्त झालेले दिसून येतात. कवी झुंजार माने हे गेल्या दशकातील नवोदित ग्रामीण कवी यांनी आपल्या प्रकाशकण उमलताना या काव्यसंग्रहातून ग्रामीण समाज जीवनाचे विविध पैलू बदलते संदर्भ, कृषिसंस्कृती, नीतीमूल्ये विचार, सामाजिक वास्तव आणि बदलती खेडी यांचा अत्यंत वेधक असा परामर्श आपल्या कवितेतून घेतलेला पहावयास मिळतो. म्हणूनच प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आणखी एका महत्वाच्या विषयाला कवीने स्पर्श केला आहे असे म्हणता येईल.

### * संदर्भ :-

१. ठाकूर रवींद्र - प्रवाह आणि प्रतिक्रिया, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, मार्च १९९९, पृ.१९
२. ठाकूर रवींद्र - प्रवाह आणि प्रतिक्रिया, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, मार्च १९९९, पृ.९२
३. गायकवाड हेमलता - आधुनिक मराठी ग्रामीण कविता एक अभ्यास,फडके प्रकाशन, प्रथम आवृत्ती १९९७, पृ.४७
४. महाडिक नलिनी - लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्याचे स्वरूप, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २०१६, पृ.९१



**प्रा.डॉ.शिवलिंग मेनकुदळे**
**मराठी विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.**